# पुणेकर हेल्मेट का वापरत नाहीत हे कळत नाही!

पुणे, दि. १३ (प्रतिनिधी) – इतर शहरांमध्ये लोक हेल्मेट घालतात; पण पुण्यात हेल्मेट का घालत नाहीत हे मला कळत नाही, असा सवाल पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी करत, मी पुण्यात आल्यापासून जनजागृती केल्याने हेल्मेट वापरण्याचे प्रमाण १० टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत गेले आहे, असा दावाही त्यांनी केला.

रस्ते सुरक्षा अभियानिमित्त पुणे पोलीस वाहतूक शाखा व मुकुल माधव फिनोलेक्स फाऊंडेशनच्या वतीने रविवारी (दि. १५) सकाळी साडेआठ वाजता पोलीस मुख्यालय येथून हेल्मेट जनजागृतीसाठी दुचाकी फेरी आयोजित केली आहे. यावेळी फिनोलेक्स व गोल्फकडून १६०० हेल्मेटचे वाटप केले जाणार आहे, असे रश्मी शुक्ला यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. सहआयुक्त सुनील रामानंद, वाहतूक शाखेच्या उपायुक्त कल्पना बारवकर, मुकुल माधव फाऊंडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया उपस्थित होत्या.

गेल्या वर्षभरात जेवढे अपघात झाले आहेत. त्यातील ६० टक्के व्यक्तींचा मृत्यू डोक्याला मार लागल्याने झाला आहे. इतर शहरांमध्ये लोक हेल्मेट घालताना दिसतात. पण पुण्यातील लोक का घालत नाहीत हे कळत नाही. आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत आहोत, पोलिसांकडून कोणतीही सक्ती केली जात नाही. घरी आपली कोणी तरी वाट पाहात असते, त्यांच्यासाठी आपण सुखरूप घरी जावे यासाठी तरी हेल्मेट घालावे. जनजागृतीतून हेल्मेट वापरणाऱ्यांची संख्या वाढली आहे, असे शुक्ला यांनी सांगितले.




## पोलिसांवर दंडात्मक कारवाई व नावे जाहीर करणार

▪ *नागरिकांना सक्ती करण्यापूर्वी पोलिसांनीही हेल्मेट घातले पाहिजे. जे पोलीस हेल्मेट न घालता गाडी चालवतील, त्यांचे फोटो काढून व गाडी क्रमांक पाठवून द्या; मी त्यांच्यावर कारवाई करेन. तसेच त्यांच्याकडून नागरिकांकडून वसूल केला जातो तेवढा दंड घेतला जाईल आणि त्यांचे नाव पोलीस नोटीसमध्ये जाहीर केले जाईल, असे शुक्ला यांनी सांगितले.*